I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 191-196
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# १९९० नंतरच्या साहित्य अकादेमी पुरस्कृत 'झोंबी','झाडाझडती','राघववेळ', 'तणकट','बारोमास', 'फेसाटी' या कादंबऱ्यामधून प्रकटणाऱ्या शैक्षणिक समस्या

**सतीश महादेवराव कर्णासे[१] व कोमल वि. ठाकरे[२]**
[१]महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर
[२]मराठी विभाग, तायवाडे महाविद्यालय महादुला, कोराडी

Communicated : 25.01.2023 | Revision : 02.03.2023 Accepted : 30.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
जीवनानुभव व्यक्त करण्याची क्षमता कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्य प्रकारात असते. परंतू कादंबरी हा साहित्य प्रकार अधिक लोकप्रिय व समाजा भिमुख असल्याचे आपणाला जाणवते. त्यानुसार समाजातील विविध प्रश्न, घडणाऱ्या घटना, जीवनातील समस्या त्याचे परिणाम कादंबरीकारावर होऊन तो आपल्या कादंबरी मधून मांडत असतो. अलीकडच्या काळात स्त्रिया शिक्षण, नोकरी यासाठी घराबाहेर पडल्या आणि आर्थिक दृष्ट्या काही प्रमाणात का होईना त्या स्वावलंबी बनल्या हे जरी खरे असले तरी त्यांच्या पुढच्या समस्या कमी झालेल्या दिसत नाही. आज एकविसाव्या शतकात देखील विज्ञान – तंत्रज्ञानाच्या युगात समस्येत फारसा बदल झालेला दिसत नाही. संघर्षातून वेगवेगळ्या समस्या उभ्या राहतात. १९९० नंतरच्या साहित्य अकादेमी पुरस्कृत 'झोंबी', 'झाडाझडती','राघववेळ','तणकट','बारोमास','फेसाटी'इत्यादी सर्वच कादंबऱ्यांमधून अशिक्षित वर्गाचे समाजातील विविध घटक शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक शोषण करतांना दिसतात. आर्थिक शोषणामुळे माणूस कसा हतबल होतो यावर या सर्वच कादंबऱ्या प्रकाश टाकतात.

**मुख्यशब्द :** विज्ञान–तंत्रज्ञान, शिक्षण, स्वावलंबी, मूल्ये, संघर्ष, प्रवृत्ती, लोकसंख्या, ब्रिटिश, पेशवेकाळ, मॅट्रिक, नैसर्गिक, पायदान, धरणग्रस्त, मोलमजुरी, पतसंस्था, कर्ज, झोंबी, झाडाझडती, तणकट, बारोमास, राघववेळ, भूमी, फेसाटी, पदवीधर, भ्रष्टाचार .

## प्रस्तावना :

जीवनानुभव व्यक्त करण्याची क्षमता कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्य प्रकारात असते. परंतू कादंबरी हा साहित्य प्रकार अधिक लोकप्रिय व समाजा भिमुख असल्याचे आपणाला जाणवते. त्यानुसार समाजातील विविध प्रश्न, घडणाऱ्या घटना, जीवनातील समस्या त्याचे परिणाम कादंबरीकारावर होऊन तो आपल्या कादंबरी मधून मांडत असतो. कादंबरीतून कोणतीही समस्या मांडल्यानंतर वाचक अंतर्मुख होऊन त्या दिशेने विचार प्रवृत्त होतो. या दृष्टिकोनातून परंपरागत समाजव्यवस्थेतील स्त्री–पुरुष जीवनाचे विविध प्रश्न काहीसे अंतर्मुख करतात व विचार करायला भाग पाडतात.

आज एकविसाव्या शतकात विज्ञान– तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय समाज जीवनाच्या समस्येत फारसा बदल झालेला दिसत नाही. वर्तमान पत्र उघडले की बलात्कार, हुंडाबळी, घटस्फोट यासारखी बातमी छापलेली असतेच. त्याशिवाय मानसिक, शारीरिकदृष्ट्या देखील गोरगरिबांवर, स्त्रियांवर अनेक अन्याय अत्याचार होताना दिसतात. अलीकडच्या काळात स्त्रिया शिक्षण, नोकरी यासाठी घराबाहेर पडल्या आणि आर्थिक दृष्ट्या काही प्रमाणात का होईना त्या स्वावलंबी बनल्या हे जरी खरे असले तरी त्यांच्या पुढच्या समस्या कमी झालेल्या दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री–पुरुष विषयक अनेक कायदे निर्माण झालेत. परंतु त्यांच्या अडचणी काही कमी झालेल्या दिसत नाही. या विविधांगी समस्या 'कादंबरी' या माध्यमातून कशा मांडल्या आहेत हे शोधण्यासाठी १९९० नंतरच्या साहित्य अकादेमी पुरस्कृत मराठी कादंबऱ्यातील विविध समस्या अभ्यासणार आहोत.

## समस्येचे स्वरूप :

अनेक व्यक्तींनी मिळून समाज बनतो. व्यक्ती व समाज यांचे अतूट नाते निर्माण झालेले दिसते. व्यक्तीशिवाय समाज आणि समाजाशिवाय व्यक्ती वेगळी राहू शकत

नाही. त्यामुळे व्यक्ती ही समाजासोबत जगत असते. व्यक्ती ज्या समाजात वावरते त्या समाजाची काही मूल्ये असतात. त्यावेळी व्यक्तीच्या मनात जुनी मूल्य धरून ठेवायची की नवीन मूल्यांचा स्वीकार करायचा अशी समस्या उभी राहते. त्यातूनच व्यक्ती – व्यक्ती, व्यक्ती – कुटुंब, व्यक्ती – समाज यांच्यात संघर्ष निर्माण होतो आणि या संघर्षातून पुन्हा समस्या जन्माला येते.

समस्येची शब्दशः व्याख्या करणे कठीण आहे. 'राजहंस शब्दार्थ कोशात' समस्याचा अर्थ अडचण, कूटप्रश्न, कठीण प्रश्न, कोडे असा सांगितला आहे. समस्या उभी राहणे म्हणजे अडचण निर्माण होणे. कठीण प्रसंग समोर ठाकणे होय. समस्या आणि संघर्ष या दोन वेगवेगळ्या घटना असल्या तरी त्या परस्परावलंबी आहेत. यासंदर्भात डॉ. मधुरा कोरात्रे लिहितात, ''समस्या म्हणजे प्रश्न, संघर्ष म्हणजे संग्राम, समर प्रसंग, झगडा, द्वंद्व होय. संघर्ष म्हणजे दोन विरोधी शक्तींचा सामना. व्यक्ती विरुद्ध व्यक्ती, व्यक्ती विरुद्ध परिस्थिती आणि एकाच व्यक्तीच्या अंतर्मनातील दोन विरोधी प्रवृत्ती असे संघर्षाचे तीन ठळक प्रकार आहेत.'' यावरून असे लक्षात येते की समस्या व संघर्ष हे दोन वेगवेगळे घटक असून ते एकमेकांशी निगडित आहेत. समस्येतून संघर्ष उभा राहतो किंवा संघर्षातून पुन्हा समस्या निर्माण होते. उदाहरणार्थ 'मुलगा वंशाचा दिवा' ही एक समस्या आहे. कारण एखाद्या कुटुंबातील स्त्रीला मुलीच होऊ लागल्या तर त्या कुटुंबातील पती–पत्नीत संघर्ष निर्माण होतो. कारण त्या कुटुंबाला घराण्याला वारस मुलगाच पाहिजे असतो. मुलगा जन्माला येण्याची वाट पाहता पाहता मुलींची संख्या वाढू लागते आणि त्यातून पुन्हा लोकसंख्येची समस्या निर्माण होते. म्हणजेच समस्या आणि संघर्ष हे परस्पर पूरक घटक आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात समस्या आणि संघर्ष हे येतच असतात. फक्त त्याचे प्रमाण कमी जास्त असते.

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतीय समाज हजारो वर्ष जातीव्यवस्था, धर्म, रूढी– परंपरा यांच्या बंधनामुळे व समाजाच्या दैववादी विचारसरणीच्या प्रभावामुळे एखाद्या सुस्त अजगरा प्रमाणे अनेक समस्या घेऊन वाटचाल करीत होता. या परिस्थितीचा सर्वात जास्त जाच शूद्रांना व स्त्रियांना सहन करावा लागत असे. भगवान दास शोषणाविषयी लिहितात, ''शोषित वर्गाचा विचार केला तर सर्वप्रथम अमेरिकेतील निग्रोचा क्रमांक लागतो. इंग्रज आणि अन्य युरोपियन लोकांनी आफ्रिकेतून त्यांना गुलाम म्हणून आणले होते. त्यांना काही काळानंतर स्वतंत्र करण्यात आले. तरी अजून मागासलेपणा तून त्यांची सुटका झालेली नाही.'' अस्पृश्यता आशियातील अनेक देशात आढळते. जिथे जिथे भारतातील हिंदू गेले तिथे तिथे त्यांनी जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था नेली.

पेशवेकाळात ब्राह्मणांचे वर्चस्व वाढल्यामुळे रुढी–परंपरा, उपासना, व्रतवैकल्ये यांचे प्राबल्य निर्माण झालेली दिसते. याच काळात स्त्रियांची स्थिती ही अतिशय दयनीय होत गेलेली दिसते. बालविवाह, पतिव्रता, सतीप्रथा, बहुपत्नीत्व इत्यादी अनिष्ट प्रथांचे वर्चस्व असल्यामुळे अनेक स्त्रियांच्या जीवनात या प्रथांमुळे समस्या निर्माण झालेल्या दिसतात. त्याचप्रमाणे समाजव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या घटकांमुळे देखील स्त्रियांच्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. त्या समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**'झोंबी' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :–**

आनंद यादव यांनी 'झोंबी' कादंबरी मध्ये एका शेतकरी कुटुंबातील शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या आनंदाची शैक्षणिक समस्या मांडलेली आहे. आनंदाच्या जन्मापासून ते त्याच्या मॅट्रिकच्या परीक्षेतील यशा पर्यंतच्या धडपडीबद्दल पु. ल. देशपांडे म्हणतात,''ज्या समाजात मुलाने शाळेत जाणे ही नैसर्गिक घटना मानली जाते त्या

ब्राह्मण किंवा तत्सम वर्गातल्या मुलाने 'मॅट्रिक' होणे आणि ज्या समाजात शाळा शिकणे म्हणजे कुळाला बट्टा लावणे असे मानले जायचे त्या समाजात जन्माला आलेल्या आनंद यादव सारख्या मुलाने मॅट्रिक होणे ह्यात जमीन–अस्मानचा फरक आहे.'' आनंदाचे जीवन बालपणापासूनच अनेक समस्यांनी भरलेली आहे. कोणत्याही परिस्थितीत शिक्षण घ्यायचे या एकाच ध्येयाने तो प्रेरित झालेला आहे. हे 'शिकणं' म्हणजे चक्क घर बुडवेपणा करणे अशी त्यांच्या वडिलांची ठाम समजूत आहे. आनंदाच्या वडिलांना त्याच्या शिक्षणाबद्दल आस्था नाही, तर त्याची आई अक्षरशून्य आहे ही खरी समस्या आनंदाच्या कुटुंबाची आहे.

या कादंबरीमध्ये रतनु आणि आनंदा या बापलेकाचं नातं हे हिरण्यकश्यपूच्या नात्यासारखं आहे. 'शेतकऱ्यांचं पोर शेतकरी' ही त्याच्या वडिलांची विचारसरणी असल्यामुळे आनंदाला पाचवीमध्ये असतांनाच ते त्याला शाळा सोडायला लावतात. तरीही हा आनंदा बापूकोळी या आपल्या मित्राच्या मदतीने मळ्यात राहून रात्रभर पाचवीचा अभ्यास करू लागतो. तो दादाला म्हणतो, ''दादा मी नुसता परीक्षेला बसतो. आयता पाचवी पास हुईन आणि मळ्यातली कामबी करीन.'' ('झोंबी' पृ. ८४) दादा त्याच्या या गोष्टीला तयारी दर्शवितात खरी पण पाचवीच्या वर्गातील सहा महिन्यांची बारा आणे फी थकलेली असल्यामुळे गस्ते मास्तर आनंदाला फी साठी तगादा लावतो. तेव्हा तो आपल्या दादाला म्हणतो," दादा शाळेची सहा महिन्याची फी तटलिया.मास्तर म्हणालं, फी दिलीस तर परीक्षेला बसू देईन. मलाबाराआनं दे.''('झोंबी',पृ. ८५) त्यावर दादा म्हणतात, ते पायतान बघितलंस काय दारा मागं पडलेलं? मूत म्हटलंनवं त्या शाळवर तुझं वाडवडील काय शाळा शिकून मेलं न्हाईत. झाली तेवढी शाळा हिशेबापूरती रग्गड झाली. गप मळ्याकडं चल शेतात राब गाडी भर गुळचढझाला, मळ्याची राखण झाली तर एका गड्याचा पगार पडलं मला. तेवढाच पैसा तुझ्या जन्माला लावता येईल. ('झोंबी', पृ. ८५) वरील रतनुच्या बोलण्यातून त्याच्यावर रूढी परंपरेचा पगडा किती आहे. पुरुषी वर्चस्वाचा मुकूट चढवलेल्या आणि अज्ञानामुळे असलेली दिशाहिनता प्रतिगामी रतनूच्या ठिकाणी दिसून येते.

**'झाडाझडती' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :–**

अडाणी आणि अशिक्षित धरणग्रस्तांना 'झाडाझडती' या कादंबरीमध्ये कशा पद्धतीने फसविले जाते याचे प्रतिनिधी रूप म्हणजे बनुबाई करवंदे होय. बनुबाई ही अशिक्षित पण अतिशय साध्या सरळ स्वभावाची ग्रामीण स्त्री आहे. परंतु तीचाच सावत्र असलेला दत्तू करवंदे मुलगा तिला मृत दाखवून तिची जमीन हडपतो. तिला मृत दाखवून सत्तर हजार रुपये हडतो.

पांडू येताळ हा हरिजन वाड्यात जन्मलेला अशिक्षित धरणग्रस्त आहे. सरकार कडून नव्व्याण्णव वर्षाच्या कराराने तो जमीन कसायला घेतो. अशिक्षित आणि मध्यम वर्गीय असणाऱ्या पांडूने मोठ्या कष्टाने व जिद्दीने आपला संसार उभा केलेला असतो. पण काही दिवसातच जांभळी बुद्रुक मध्ये धरणाला सुरुवात होते. जांभळी गाव उठण्यास प्रारंभ झाल्यानंतर अशिक्षित धरणग्रस्त आपली गुरे बाजारात कवडीमोल भावाने विकायला काढतात. पांडू येताळही आपली बैलं वाघेठाण्याच्या बाजारात कवडीमोल किमतीला व्यथित अंत:करणाने विकून टाकतो. संपादित घराचे आणि जमिनीचे पैसे वाटप करीत असतांना त्याच्याकडे असलेल्या नव्व्याण्णव वर्षाच्या करारी जमिनीचे पैसे त्याला मिळत नाही. सरकारी अधिकारीही त्याच्या अशिक्षितपणाचा फायदा उचलून त्याला फक्त तीन एकराच्या भूसंपादनाचे पैसे देतात. धरणग्रस्तांच्या अशिक्षितपणाचा फायदा ऊचलुन सरकारी अधिकारी देखील त्यांचे कसे शोषण करतात ही

शैक्षणिक समस्या विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' त मांडली आहे.

**'राघववेळ' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :—**

नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' कादंबरीतील वालंबीची मुलगी कौसा हिला शिक्षण न मिळाल्यामुळे तिचं बालपण दारिद्र्यातच जाते. कळत्या वयापासून ती मोलमजुरीच्या कामात आईला मदत करते. शिक्षणाच्या बाबतीत तिची उपेक्षाच होते. हरणी पायरुची बायको ही देखील शिक्षणापासून वंचित राहते. त्यामुळे दारिद्र्यातच तिला दिवस काढावे लागतात. आजही मातंग समाजात स्त्रीला शिक्षणाअभावी दुय्यम स्थान दिले जाते. गजरी, सावित्री, यमुना, सैनी इत्यादी स्त्रिया शिक्षणाअभावी या कादंबरीत मोलमजुरी करताना दिसतात.

**'तणकट' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :—**

राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरी मध्ये हरिजन वाड्यातील मुले ही अर्धवट शिक्षण सोडून हिंडत राहतात. गवत्या सारख्या उडाणटप्पू पोराच्या मागे दलित तरुण मुले दिशाहीनपणे भटकत राहतात. त्यांच शिक्षण अर्धवट असल्यामुळे नोकरी मिळत नाही. बाळासाहेब शेडबाळे हरिजन वाड्यतील माणसांना वेडे करून सोडतो. गावाशी संघर्ष करायला लावून त्यांच्यातील शक्ती वाया घालवितो. त्यांच्याच नावावर पतसंस्थेकडून कर्ज काढून स्वत: पैसे हडप करतो, आणि आपली बदली लांब करून घेतो.

महार वाड्यातील मुलांना दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्यामुळे त्यांना शाळेत पायी जावे लागते. एके दिवशी कबीर जेव्हा कॉलेजच्या पटांगणामध्ये पोहोचतो तेव्हा सगळे तास सुरू झालेले असतात. किमान तास सुरू होऊन वीस मिनिटे झालेली असतात. त्यामुळे त्याचे नेहमीच शैक्षणिक नुकसान होते.

'तणकट' या कादंबरीमध्ये मुलांची शिक्षणाबद्दलची अनास्था दिसून येते. याचे चित्रण पुढील प्रसंगातून दिसून येते, ''महार वाड्यातील तक्त्याच्या कटीवर तेथील सगळी पोरं नेहमीसारखी गल लावून बसलेली असतात. गवत्या हा दहावी नापास तरुण उभ्याउभ्याच गप्पा छाटत असतो. अंगावर तालेवार टॉवेल, खाकी रंगाची पॅन्ट, हातात चमकणाऱ्या पट्ट्याचे घड्याळ अशी वेशभूषा धारण करून आपण बसलो तर पॅन्ट चुरगडेल या भीतीने तो उभाउभाच सगळ्यांशी बोलत असतो. त्याच्यासमोर पांढरी लुंगी लावून नुसत्या बनियन वर तोंडात तंबाखू धरून बसलेला असतो. त्याच्या गळ्यात साईबाबाचा ताईत लोंबत असतो. शेजारीच पांड्या, तान्या, इटल्या अशी सगळी रिकामटेकडी पोरं बसलेली असतात. त्यांच्या सोबतीनं हायस्कूलमध्ये शिकनारी हाऱ्या, तुळज्या, तुक्या ही बारकी पोरं त्यांच्यात मीसळून बसलेली असतात. ('तणकट' पृ. १२) वरील प्रसंगातून महारवाड्यतील मुलांची शिक्षणाबद्दलची असणारी अनास्था दिसून येते.

**'बारोमास' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :—**

'बारोमास' कादंबरी मध्ये सदानंद देशमुख यांनी शेतकरी कुटुंबातील शिक्षण पूर्ण करून बेकार असणाऱ्या बेरोजगार तरुणांच्या समस्या प्रभावीपणे मांडल्या आहेत. शिक्षणामुळे खेड्यातला युवक नोकरीच्या माध्यमातून आपल्या ढासळत्या कुटुंबाला सावरेल अशा प्रकारची अपेक्षा असते. परंतु अलीकडच्या काळात ही अपेक्षा फोल ठरत चाललेली आहे. 'बारोमास' कादंबरीचा नायक एकनाथ हा एम. ए. बी. एड. झालेला आहे, मधु हा कृषी पदवीधर आहे, दिलीप पवार हा बी.ए. बीएड. आहे, गजा आणि दाम्या आयटीआय झालेले आहेत, तसेच तेजस गवई हा डी.एड. झालेला आहे. परंतु हे सर्व तरुण शिक्षण घेऊनही बेरोजगार आहेत. नोकरीच्या शोधात भटकणारे आहेत. या सर्व तरुणांमध्ये गुणवत्ता असूनही त्यांना नोकरी लागत नाही. भ्रष्टाचारी समाजव्यवस्थेच्या विळख्यात बरबाद झालेल्या तरुण पिढीचे प्रतिनिधी हे सर्व तरुण आहेत.

'बारोमास' कादंबरीत आलेल्या सोनेरी टोळीच्या रूपाने ग्रामीण तरुणांच्या बेरोजगारीचे आणि त्यांच्या वैफल्यग्रस्त मानसिकतेचे प्रभावी दर्शन घडते. शिवाय ही वैफल्यग्रस्त तरुण पिढी भविष्यात कोणत्या दिशेने वळू शकेल याचेही सुतोवाच केले गेले आहे. सुशिक्षित असलेले हे सर्व तरुण जमिनीखालचे सोने शोधायचं सोडून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावरचे सोने लुटण्याचा निर्णय घेतात. म्हणजेच गुन्हेगारीकडे वळतात. शासनाने शेतकऱ्यांच्या शिकलेल्या तरुणांसाठी उदार दृष्टिकोनातून काही धोरणात्मक निर्णय घेतले नाहीत तर भविष्यात समाजाला कोणत्या भयान वास्तवाला सामोरे जावे लागेल याचे सुतोवाच या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी केले आहे. ग्रामीण तरुणांना पात्रता असतांना नोकऱ्या लागत नाहीत या पाठीमागे समाजातील भ्रष्ट व्यवस्था आहे. याचेही दर्शन ही कादंबरी घडवते. तहसीलदार बाप असलेल्या सोपान भगतला कमी गुणवत्ता असूनही सहज नोकरी मिळते. परंतु दिनकर दाभाडे सेट परीक्षा उत्तीर्ण होऊनही नोकरीपासून वंचित राहतो. शैक्षणिक क्षेत्रातल्या नोकरीसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होतो. अर्थातच आधीच दारिद्र्याशी झगडत असलेला शेतकरी एवढी मोठी रक्कम आपल्या मुलांच्या नोकरीसाठी देऊ शकत नाही. म्हणून ग्रामीण भागातील तरुण नोकरीपासून वंचित कसे राहतात ही शैक्षणिक समस्या ही कादंबरी मांडते.

**'फेसाटी' कादंबरीतील शैक्षणिक समस्या :—**

नवनाथ गोरे यांनी 'फेसाठी' या कादंबरीतून समाजातील विविध समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात विविध स्तर असतात. त्यात दारिद्र्याने पिचलेल्या अल्पशिक्षित, मोलमजुरी करणाऱ्या समाजाची व्यथा ही इतरांपर्यंत पोचत नाही. तो समाज गरिबीत जगत असतो. अशा समाजात जन्मलेल्या लहानपणापासून विविध समस्या, संघर्ष, उपासमार अनुभवलेल्या व अशाही परिस्थितीत आई–वडिलांच्या तळमळीमुळे शिक्षणाची वाट धरलेल्या नवनाथ गोरे यांनी त्यांचे जिने हे 'फेसाटी' कादंबरीत मांडले आहे.

नवनाथ गोरे यांनी त्यांचा शिक्षणाचा प्रवास व त्या काळातील शैक्षणिक समस्या 'फेसाटी' या कादंबरीतून मांडल्या आहेत. 'फेसाटी' या कादंबरीमध्ये नवनाथ गोरे यांनी आपल्या जीवनाची झालेली हेळसांड, पोटासाठी करावा लागणारा संघर्ष, कर्जबाजारी शेतकऱ्यांची व्यथा मांडली आहे. लेखकाचे व त्याच्या कुटुंबाचे जगणे म्हणजे फक्त समस्यांची मालिकाच आहे. आयुष्यभर या कुटुंबाने फक्त संकटांचा सामना केलेला दिसतो. सुखाचा एकही क्षण त्यांना लाभला नाही. अनेक अडथळे, समस्या पार करत लेखकाने एम. ए. पर्यंतचे शिक्षण घेतले.

नवनाथ पाच वर्षाचा झाला तेव्हा पहिलीत नाव घालण्यासाठी दादा शाळेत घेऊन गेला पण कोळी गुरुजींनी लहान आहे असे म्हणून नकार देतात. इंदाताईचे नाव पहिलीत घेतले तेव्हा काकू म्हणते, ''एवढं वरीस राहूद्या. शाळेला जातचं नाय म्हनतूया. पुढल्या वरीस घालूया'' ('फेसाटी' पृ. २४) आईबरोबर नवनाथ शेतात जाऊ लागतो ती ज्या ठिकाणी कामाला जाते त्या ठिकाणी तोही जातो व अशा प्रकारे त्याचे एक वर्ष वाया जाते.

नाथाचा शाळेत जाण्याचा पहिलाच दिवस असतो. पूर्ण नाव सांगितले नाही म्हणून गुरुजी नाथाला मारतात. इतके मारले की, नाथाची चड्डी ओली झाली. त्यामुळे नाथा शाळेत जाण्यास घाबरतो. पुढें नाथा तिसरीतून चौथीत जातो. इंदाताई पाचवीत जाते पण नाथासाठी तिला पुन्हा चौथीतच बसावे लागते. सातपुते गुरुजी नाथाला पाढे येत नाहीत म्हणून बेदम मारतात. त्यामुळे नाथा शाळेत जाण्यास घाबरतो. चौथी नापास होतो, कारण तो परीक्षेला बसलाच नाही. काकु नाथाला पुन्हा शाळेत जाण्याचा आग्रह करते. पण तो मानेवस्तीवरच्या शाळेत न जाता

मर्चंडी वस्तीच्या शाळेत जाण्याचा आग्रह धरतो. म्हणून त्याला मर्चंडी वस्तीच्या शाळेत घातले. पण तिथेही गुरुजी नाथाला मारतात त्यामुळे बरेच दिवस तो शाळेत जात नाही.

नाथा सहावीच्या वर्गात जातो. त्याच्या इयत्ता वाढतात पण गुरुजीचा मार काही चुकत नाही. सातवीच्या वर्गात असतांना एक प्रसंग नाथाने सांगितला आहे, तो पुढीलप्रमाणे, ''मी पेनचं टोपानं काढलं नं झाडाला जोरात पेन. उडाली शाई, ती शाई सविता व सुरेखाच्या अंगावर पडली. सविताच्या अंगावर निळा नकाशाच उठला. पोरगी लागली रडायला. थई थई नाचायला लागली. म्या लईच भीलू'' ('फेसाटी' पृ. ८६) यावेळी वाघमारे सरांनी हातावर चार छड्या मारल्या. दुसऱ्या सरांनीही छड्या मारल्या. नाथाने पुन्हा शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला. वरील सर्व घटकांचा नाथाच्या मनावर परिणाम होऊन त्याला वाटू लागले की, ''माझा जन्म काय मार खायला झाला व्हय. हितनं पुढ मार खायचा नाय, शाळलाबी जायचं, आपलं रानात काकू बरोबर खुरपायला गेल्यानं लई बरं रे बाबा. ('फेसाटी' पृ. ९२) आठव्या वर्गाची परीक्षा पास झाल्यानंतर नववी आणि दहावी संपल्यावर शिपायाची का होईना नोकरी मिळेल अशी अपेक्षा नाथाला वाटते. आनंदाची गोष्ट म्हणजे बोर्डिंगातले सात जण पास होतात. त्यात नाथाही पास होतो. पुढे जुनियर कॉलेज, बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण होतो. एम.ए. होतो. पण शिक्षणासाठी आणि बहिणीच्या लग्नासाठी वडिलांना कर्ज काढावे लागते. त्यामुळे कर्जाचा डोंगर वाढत जातो. दादा, नाथा व इंदाताई यांच्या शिक्षणाचा उल्लेख कादंबरीत आला आहे. पण हलाखीच्या परिस्थितीमुळे इतर बहिणींना शाळेतही घातले नाही. अन्न, वस्त्र, निवारा व आजच्या काळातील शिक्षण ह्या प्राथमिक गरजांसाठी या युगातील नाथाच्या कुटुंबाला संघर्ष करावा लागतो. यासारखी दुसरी शोकांतिका नाही.

**निष्कर्ष :–**

आज एकविसाव्या शतकात देखील विज्ञान – तंत्रज्ञानाच्या युगात समस्येत फारसा बदल झालेला दिसत नाही. संघर्षातून वेगवेगळ्या समस्या उभ्या राहतात. १९९० नंतरच्या साहित्य अकादेमी पुरस्कृत 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'तणकट','बारोमास',' फेसाटी' इत्यादी सर्वच कादंबऱ्यांमधून अशिक्षित वर्गाचे समाजातील विविध घटक शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक शोषण करतांना दिसतात. आर्थिक शोषणामुळे माणूस कसा हतबल होतो यावर या सर्वच कादंबऱ्या प्रकाश टाकतात. अज्ञानरूपी अंध:कार दूर करायचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हेच सूत्र या सर्व कादंबऱ्या मांडतात.

**संदर्भ :**

मधुरा कोरात्रे,'स्त्री समस्या आणि आजचे नाटक' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९६, पृ. २३.

भगवानदास, 'वंचितांचा मुक्तिदाता डॉ. आंबेडकर' लोकराज्य विशेषांक, ऑक्टोबर, २००६ पृ. २९.

आनंद यादव, 'झोंबी', मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण: एप्रिल, २००७.

विश्वास पाटील, 'झाडाझडती', राजहंस प्रकाशन, पुणे, तेविसावी आवृत्ती: ऑक्टोबर २०१७.

राजन गवस, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

सदानंद देशमुख, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, तृतीयावृत्ती २००७.

आशा बगे, 'भूमी', मौज प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती.

नवनाथ गोरे,'फेसाटी' अक्षर वांग्मय प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती,९ सप्टेंबर २०१८.